# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९३-२२ दिनांक २४/१२/२०२२

## नवघर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या दोन वेगवेगळया गुन्हयातील आरोपीतांना अटक करुन चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत.

श्री. प्रताप चोहीतराम बेहरवानी वय-७५ वर्षे, रा-मिरारोड-पुर्व, यांचा मेहक ज्वेलरी पत्ता-ओम साई कमर्शियल कॉम्पलेक्स, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर-पुर्व, ठाणे येथे ज्वेलरी बनविण्याचा व्यवसाय असून त्यासाठी त्यांच्याकडे काही कामगार काम करतात. त्यापैकी एक कामगार नामे जितेंद्र रा-नालासोपारा असा असुन त्याने दिनांक १७/१२/२०२२ रोजी फिर्यादी यांच्या कंपनीतुन ६० ग्रॅम वजनाचे व रुपये-१,५०,०००/- किंमतीचे सोने चोरी करुन निघुन गेला होता. सदरबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाणेस तक्रार दिल्याने नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९७७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३८१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने फिर्यादी यांच्याकडे आरोपीबाबत चौकशी केली असता त्यांच्याकडे संशईताचा फोटो तसेच त्याचे वास्तव्याचे ठिकाण किंवा पुर्ण नांव याबाबत काहिही माहिती उपलब्ध नव्हती. तसेच त्याचा मोबाईल क्रमांक देखील बंद असल्याचे तपासामध्ये आढळून आले. त्यामुळे नवघर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने अधिक कौशल्यपुर्वक तपास करुन सदर गुन्हयातील आरोपी नामे जितेंद्र कांथी पिल्ली वय-३८ वर्षे, रा-विजयनगर, नालासोपारा-पुर्व, ता-वसई, जि-पालघर याचेबाबत सखोल माहिती काढून त्यास नमुद गुन्हयात दिनांक २१/१२/२०२२ रोजी नालासोपारा येथुन अटक केली आहे. सदर गुन्हयातील आरोपी याच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान तपास करुन त्याच्याकडुन त्याने गुन्हयातील चोरी केलेली मालमत्ता ६० ग्रॅम वजनाचे व रुपये-१,५०,०००/- किंमतीचे सोने अशी गुन्हयात चोरी झालेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे फिर्यादी श्री नरेश राजधर दुबे यांच्या गाळा नं-डी/०२, विकास इंडस्ट्रीयल इस्टेट, फाटक रोड, भाईंदर-पुर्व, ठाणे येथील लाकडी व लोखंडी फर्निचर बनविण्यासाठी लागणा-या स्टीलच्या वस्तु बनविण्याचे कारखान्यामध्ये दिनांक १७/१२/२०२२ ते दिनांक १८/१२/२०२२ रोजी दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी कारखान्याच्या छताचे पत्रे फोडुन आत प्रवेश करुन २८५ किलो वजानाच्या रुपये-६०,०००/- किंमतीच्या स्टीलच्या वस्तु चोरी करुन नेल्या होत्या. सदरबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९८०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा हा रात्रीच्यावेळी घरफोडीचा असल्याने नवघर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे व तांत्रीक विश्लेषण करुन आरोपी नामे अजय विजय व्यास, वय-१९ वर्षे व आशिष लक्ष्मण वाघे, वय-१९ वर्षे रा-भाईंदर-पश्चिम, ठाणे यांना फायरबिग्रेड ऑफिसमोरील फुटपाथ, भाईंदर-पश्चिम, ठाणे येथुन ताब्यात घेवुन दिनांक २१/१२/२०२२ रोजी अटक केली आहे. सदर गुन्हयातील आरोपी यांच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान तपास करुन त्यांनी गुन्हयातील चोरी केलेली मालमत्ता २८५ किलो वजनाचे रुपये-६०,०००/- किंमतीच्या स्टीलच्या वस्तु अशी संपुर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. सदरच्या दोन्ही गुन्हयाचा पुढील तपास सपोनि योगेश काळे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजित लांडे, पोह-भुषण पाटील, गणेश जावळे, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पोशि-ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---ooo---